| | |
|---|---|
| MHOS150015282021 | प्रकरण दाखल तारीख : ०८.१०.२०२१ |
| | प्रकरण नोंदणी तारीख : ०८.१०.२०२१ |
| | प्रकरण निकाल तारीख : १५.०७.२०२६ |
| | निकालाचा कालावधी : ०४व. ०९म. ०७दि |

**नियमित फौजदारी खटला क्र. २८१/२०२१**

**निशाणी क्र. ४५**

| | |
|---|---|
| | **<u>न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग न्यायालय परंडा यांचे न्यायालयात,</u>**<br>( पीठासीन अधिकारी : दिलीप गं. जगताप) |
| | प्रथम खबर २८४/२०२१<br>भा. दं. वि. कलम ४५२,३२४, ३२३, ५०४, ५०६, ३४ अन्वये.<br>पोलीस स्टेशन, परंडा. |
| फिर्यादी | महाराष्ट्र शासन तर्फे–<br>पोलीस स्टेशन अधिकारी परंडा, ता. परंडा, जिल्हा उस्मानाबाद. |
| तर्फे | सहाय्यक सरकारी अभियोक्ता– श्री. एस.व्ही. बादुले |
| आरोपी | १. शितल किरण रणदिवे,<br>वय – २५ वर्षे, धंदा – घरकाम<br>२. मंगल महादेव जमदाडे,<br>वय – ६० वर्षे, धंदा – घरकाम<br>दोघे रा. – भिमनगर, भोत्रा रोड, परंडा, ता. परंडा, जिल्हा उस्मानाबाद. |
| तर्फे | विधीज्ञ– श्री. ए. डी. खरसडे |

| | |
|---|---|
| घटना घडल्याची दिनांक | १८.०८.२०२१ |
| प्रथम खबर दिनांक | २०.०८.२०२१ |
| दोषारोप पत्र दाखल केल्याची दिनांक | ०४.१०.२०२१ |
| न्यायालयाने आरोप निश्चित केल्याची दिनांक | ०८.०२.२०२२ |
| पुरावा सुरू झाल्याची दिनांक | ०७.०८.२०२४ |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याची दिनांक | १५.०७.२०२६ |
| न्यायनिर्णयाची दिनांक | १५.०७.२०२६ |
| शिक्षा दिली असल्यास, त्याची दिनांक | – |

**आरोपीचा तपशील**

| आरोपीचे नाव | अटक केल्याची दिनांक | जामिनावर मुक्तता केल्याची तारीख | गुन्हयाची कलमे | आरोपीस शिक्षा करण्यात आली किंवा निर्दोष ठरवण्यात आले. | देण्यात आलेली शिक्षा | फौ. प्र. सं. कम ४२८ करीता संपरीक्षे दरम्यान आरोपीने कारागृहात घालविलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १. शितल किरण रणदिवे<br><br>२. मंगल महादेव जमदाडे | २४.०८.२०२१ | २४.०८.२०२१ | भा. दं. वि.कलम ४५२, ३२४,३२३, ५०४,५०६ सह ३४ प्रमाणे. | निर्दोष | – | – |

**अ– अभियोजन पक्षाचे साक्षीदार –**

| क्र. | साक्षीदाराचे नाव | निशाणी क्र. | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|---|
| १. | शिवाजी अर्जुन सोनवणे | २१ | पंच साक्षीदार |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | सारीका अमोल बनसोडे | २३ | फिर्यादी |
| ३. | विमल बाबासाहेब बनसोडे | २५ | पंच साक्षीदार |
| ४. | वेदांत अमोल बनसोडे | २७ | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |
| ५. | लक्ष्मी नितीन बनसोडे | २८ | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |
| ६. | शबाना फय्याज मुल्ला | ३६ | तपासीक अंमलदार |
| ७. | डॉ. अंकुश भाऊराव पवार | ३९ | वैदयकीय अधिकारी |

**ब– बचाव पक्षाचे साक्षीदार**

| **क्र.** | **साक्षीदाराचे नाव** | **निशाणी क्र.** | **पुराव्याचे स्वरूप** |
|---|---|---|---|
| – | – | – | – |

**क– न्यायालयीन साक्षीदार**

| **क्र.** | **साक्षीदाराचे नाव** | **निशाणी क्र.** | **पुराव्याचे स्वरूप** |
|---|---|---|---|
| – | – | – | – |

**अभियोजन पक्ष / बचावपक्ष / न्यायालयीन कागदपत्रांची यादी व निशाण्या**

**अ– अभियोजन पक्ष**

| **क्र.** | **दस्तऐवजाचा तपशिल** | **निशाणी क्र.** |
|---|---|---|
| १. | फिर्याद/जबाब | २४ |
| २. | घटनास्थळासह जप्ती पंचनामा | २६ |
| ३. | फिर्यादी यांचे घरचे लाईट बिल | ३७ |
| ४. | वैद्यकिय प्रमाणपत्र | ४० |

**ब– बचावपक्ष**

| क्र. | दस्तऐवजाचा तपशिल | निशाणी क्र. |
|---|---|---|
| – | – | – |

**क– न्यायालयीन दस्तऐवज**

| अ.क्र. | दस्तऐवजाचा तपशिल | निशाणी क्र. |
|---|---|---|
| १. | दोषारोप | १७ |
| २. | फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ | ४२,४३ |

**ड– जप्त मुद्देमाल–**

| अ.क्र. | वस्तुचा तपशिल | आर्टिकल क्र. / |
|---|---|---|
| १. | एक बांबुची काठी चार फुट चार इंच लांबीची | अ |

## न्या य नि र्ण य

(घोषीत दिनांक : १५.०७.२०२६)

आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान कलम ४५२, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ अन्वये दंडनिय गुन्ह्यांसाठी खटला चालविण्यात आला.

**अभियोजन पक्षाचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे :–**

**०२.** सदर प्रकरणातील फिर्यादी नामे सारिका अमोल बनसोडे वय ३० वर्षे व्यवसाय मजुरी रा. भिमनगर, परंडा, ता. परंडा जि. उस्मानाबाद हि दिनांक १८.०८.२०२१ रोजी संध्याकाळी ८.०० वाजताचे सुमारास घरामध्ये स्वयंपाक करीत असताना आरोपी शितल किरण रणदिवे व मंगल महादेव जमदाडे या दोघी

घरामध्ये आल्या व काही न बोलता आरोपी शितल हिने फिर्यादीचे तोंड दाबले तसेच हातातील लाकडी काठीने फिर्यादीचे उजवे, डावे हातावर तळावर, पाठीवर तसेच नाकावर मारुन जखमी केले व उजव्या हाताच्या अंगठयास तोंडाने चावा घेतला व शिवीगाळ केली. आरोपी मंगल जमदाडे हिने फिर्यादीस "तु माझे जावया सोबत बोललीस तर तुझा जीव घेईन व कुणाला पत्ताही लागु देणार नाही" अशी जिवे मारण्याची धमकी दिली. तसेच लाथाबुक्यांनी मारहाण केली. फिर्यादीने आरडाओरडा केल्याने शेजारी राहणारे आप्पा कांबळे, लक्ष्मी नितीन बनसोडे आले त्यामुळे आरोपी निघुन गेले. त्यानंतर फिर्यादी परंडा येथे पोलिस स्टेशनमध्ये आली. पोलिसांनी फिर्यादीला उपजिल्हा रुग्णालय, परंडा येथे उपचारासाठी पाठवले. उपचार घेवुन आल्यानंतर दिनांक २०.०८.२०२१ रोजी फिर्यादीने आरोपींविरुध्द पो. स्टेशन परंडा येथे तक्रार दिली.

**०३.** सदर फिर्यादीवरुन गु.र.क्र. २८४/२०२१, कलम ४५२, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ भारतीय दंड विधान अंतर्गत दंडनिय गुन्ह्यांसाठी नोंदविण्यात आला. तपासाअंती आरोपीने गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने तपासाधिकारींनी आरोपीविरूध्द भारतीय दंड विधान कलम ४५२, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ अन्वये दंडनिय गुन्ह्यांसाठी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

**०४.** आरोपीविरुध्द माझे विद्वान पूर्वाधिकारी यांनी निशाणी क्रमांक १७ अन्वये दोषारोप निश्चित केले. आरोपीस दोषारोप वाचून दाखविला व समजावून सांगितला. आरोपीने आरोप नाकारले व खटला चालविण्याची विनंती केली. आरोपीविरूध्द खटला चालविण्यात आला. आरोपीचा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ नुसार जबाब नोंदविण्यात आला. अभियोजन पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. आरोपीचे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात

आला.

**०५.** अभियोजन पक्षाने दिलेला पुरावा व आरोपीचा बचाव व उभय पक्षांचे वकीलांचे युक्तिवाद लक्षात घेता माझे समक्ष खालील मुद्दे निर्णयार्थ उपस्थित झाले व त्यावरील माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे :–

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दिनांक १८.०८.२०२१ रोजी रात्री ८.०० वाजता भिमनगर, परंडा येथे आरोपींनी फिर्यादीच्या घरात येवुन काठीने व लाथाबुक्क्यांनी फिर्यादीस मारहाण करुन जखमी केल्याचे तसेच शिवीगाळ करुन व जीवे मारण्याची धमकी दिल्याचे अभियोजन पक्षाने सिध्द केले काय ? | नकारार्थी. |
| २. | आरोपींनी भा. दं. वि. कलम ४५२ सह ३४ अन्वये दंडनिय गुन्हा केला असे अभियोजन पक्षाने सिध्द केले काय? | नकारार्थी. |
| ३. | आरोपींनी भा. दं. वि. कलम ३२४ सह ३४ अन्वये दंडनिय गुन्हा केला असे अभियोजन पक्षाने सिध्द केले काय? | नकारार्थी. |
| ४. | आरोपींनी भा. दं. वि. कलम ३२३ सह ३४ अन्वये दंडनिय गुन्हा केला असे अभियोजन पक्षाने सिध्द केले काय? | नकारार्थी |
| ५. | आरोपींनी भा. दं. वि. कलम ५०४ सह ३४ अन्वये दंडनिय गुन्हा केला असे अभियोजन पक्षाने सिध्द केले काय? | नकारार्थी. |
| ६. | आरोपींनी भा. दं. वि. कलम ५०६ सह ३४ अन्वये दंडनिय गुन्हा केला असे अभियोजन पक्षाने सिध्द केले काय? | नकारार्थी. |
| ७. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**०६.** अभियोजन पक्षाने आरोपींविरूध्द लावण्यात आलेले आरोप सिध्द करण्यासाठी खालील साक्षादाराची साक्ष नोंदविली.

| क्र. | साक्षीदाराचे नाव | निशाणी क्र. | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|---|
| १. | शिवाजी अर्जुन सोनवणे | २१ | पंच साक्षीदार |
| २. | सारीका अमोल बनसोडे | २३ | फिर्यादी |
| ३. | विमल बाबासाहेब बनसोडे | २५ | पंच साक्षीदार |
| ४. | वेदांत अमोल बनसोडे | २७ | साक्षीदार |
| ५. | लक्ष्मी नितीन बनसोडे | २८ | साक्षीदार |
| ६. | शबाना फय्याज मुल्ला | ३६ | तपासीक अंमलदार |
| ७. | डॉ. अंकुश भाऊराव पवार | ३९ | वैदयकीय अधिकारी |

**०७.** आरोपींनी त्याचे बचावाचे पृष्ठयर्थ कोणताही साक्षीदार तपासलेला नाही.

### मुद्दा क्र. १ करीता :-

**०८.** अभियोग पक्षातर्फे विद्वान सरकारी वकिलांनी अभियोग पक्षाने त्यांची केस सिध्द केलेली आहे. प्रकरणातील घटनास्थळ व जप्ती पंचनामा सिध्द झालेला आहे. तसेच तथाकथीत घटना तारखेला फिर्यादी जखमी होती हे उपलब्ध वैदयकीय पुराव्यावरुन सिध्द होते. तसेच साक्षीदार क्र. २ सारिका बनसोडे फिर्यादी तसेच साक्षीदार क्र. ४ वेदांत अमोल बनसोडे, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांची साक्षीवरुन आरोपींनी गुन्हा केल्याचे सिध्द होते. त्यांचे उलटतपासामध्ये बचाव पक्षाने त्यांचे

साक्षीवर का विश्वास ठेवु नये हे दर्शवण्यासाठी कोणताही पुरावा दिलेला नाही. त्यांचे साक्षीमध्ये ज्या त्रुटी आहेत, त्या शुल्लक आहेत. त्यामुळे साक्षीदारांचा पुरावा विश्वासार्ह आहे. साक्षीदारांचा पुरावा विचारात घेणेत यावा असा युक्तिवाद केला.

**०९.** आरोपीतर्फे वकिलांनी फिर्यादी साक्षीदार क्र. २ तसेच साक्षीदार क्र.४ वेदांत अमोल बनसोडे यांची साक्ष तथाकथीत घटनेशी सुसंगत नाही, विरोधाभासी आहे. तसेच वैदयकीय पुरावा घटनेशी विसंगत आहे. त्यामुळे अभियोग पक्षाची साक्ष विश्वासनीय नाही. त्यामुळे आरोपींविरुध्द लावण्यात आलेले दोषारोप संशयापलीकडे जावुन सिध्द होवु शकत नाही. आरोपींना संशयाचा फायदा मिळावा असा युक्तिवाद केला.

**१०.** सदर प्रकरणात साक्षीदार क्र. १ घटनास्थळ पंच शिवाजी अर्जुन सोनवणे हा अभियोजन पक्षास फितुर झाला. तसेच साक्षीदार क्र. ३ विमल बाबासाहेब बनसोडे यांनी अभियोजन पक्षास सहकार्य केले. साक्षीदार क्र. ५ लक्ष्मी नितीन बनसोडे तथाकथीत घटनेची प्रत्यक्षदर्शी साक्षीदार अभियोजन पक्षास फितुर झाली. तिची अभियोजन पक्षातर्फे उलटतपासणी घेण्यात आली. तरीसुध्दा तिने अभियोजन पक्षास सहकार्य केले नाही. सदर प्रकरणातील साक्षीदार क्र. ६ तपासीक अंमलदार शबाना फय्याज मुल्ला तसेच साक्षीदार क्र. ७ डॉ. अंकुश पवार हे औपचारीक साक्षीदार आहेत. इतर सबळ पुरावा अभिलेखावर असल्याशिवाय त्यांचा पुरावा विचारात घेतला जावु शकत नाही.

**११.** सदर प्रकरणात घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार फिर्यादी सारिका अमोल बनसोडे तसेच फिर्यादीचा मुलगा वेदांत अमोल बनसोडे हे आहेत. याव्यतिरिक्त घटनेचे कोणीही प्रत्यक्षदर्शनी साक्षीदार नाहीत. इतर कोणत्याही साक्षीदारांनी आरोपींना फिर्यादीच्या घरामध्ये प्रवेश करताना व फिर्यादीस मारहाण करताना

पाहिल्याचे सांगितले नाही. सदर प्रकरणात निर्णय देण्यासाठी साक्षीदार क्र. २ व ४ यांची साक्ष महत्वाची आहे.

**१२**. साक्षीदार क्र. २ सारिका तसेच साक्षीदार क्र. ४ वेदांत या दोनही साक्षीदारांनी घटनेची तारीख व वेळ फिर्याद नि. क्र. २४ प्रमाणे सांगितली. फिर्यादीचे फिर्याद प्रमाणे आरोपी शितल किरण रणदिवे व मंगल महादेव जमदाडे या दोघी घरामध्ये आल्या व काही न बोलता आरोपी शितल हिने फिर्यादीचे तोंड दाबले तसेच हातातील लाकडी काठीने फिर्यादीचे उजवे, डावे हातावर तळावर, पाठीवर तसेच नाकावर मारुन जखमी केले व उजव्या हाताच्या अंगठयास तोंडाने चावा घेतला व शिवीगाळ केली, आरोपी मंगल जमदाडे हिने फिर्यादीस "तु माझे जावया सोबत बोलल्लीस तर तुझा जीव घेईन व कुणाला पत्ताही लागु देणार नाही", अशी जिवे मारण्याची धमकी दिली, तसेच लाथाबुक्यांनी मारहाण केली असे कथन आहे.

**१३**. फिर्यादीने व साक्षीदार क्र. ४ वेदांत बनसोडे यांनी त्यांचे पुराव्यात फिर्याद नि. क्र. २४ प्रमाणे प्रत्यक्ष घटने संदर्भात साक्ष दिली नाही. फिर्यादीने तिचे पुराव्यात आरोपी आले व त्यांनी तिच्या डोळयात चटणी टाकली व लाथाबुक्यांनी मारहाण केली तसेच तिला चाकु दाखवला व तिचे नरडयाला लावला, आरोपी शितल तिचे हाताला चावली, आरोपीने तिचे नरडे दाबले व तिचे गळयातील सोन्याचा पत्ता नेला असे सांगितले.

**१४.** साक्षीदार क्र. ४ वेदांत बनसोडे याने त्याचे सरतपासणीमध्ये आरोपी त्यांचे घरी आले, त्यांचे हातात पिशवी होती, काठी होती, आरोपी शितलने त्याचे आईला लाथाबुक्यांनी हाणले तसेच मानेवर चाकुने मारले, आरडाओरडा केला असता आरोपी पळुन गेले असे सांगितले.

**१५.** फिर्यादीने तिचे सरतपासणीत दोन्ही आरोपींविरुध्द सांगितले. साक्षीदार क्र. ४ वेदांत याने फक्त आरोपी शितल विरुध्द सांगितले. आरोपी मंगल विरुध्द काहीही सांगितले नाही. दोन्ही साक्षीदार सदर प्रकरणातील महत्वाचे व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहेत. त्या दोन्ही साक्षीदारांची साक्ष घटनेशी तसेच एकमेकांच्या साक्षीशी सुसंगत असायला पाहिजे, विरोधाभासी नाही.

**१६.** सदर प्रकरणातील दोनही साक्षीदारांची साक्ष फिर्यादी नि. क्र. २४ मधील घटनेशी सुसंगत नाही तसेच त्यांचे एकमेकांचे साक्षीशी सुसंगत नाही. त्यामुळे तथाकथीत घटना घडली, आरोपींनी फिर्यादीचे घरामध्ये बेकायदेशीरित्या प्रवेश करुन फिर्यादीस काठीने व लाथाबुक्यांनी मारहाण केली हे संशयास्पद दिसुन येते. या साक्षीदारांच्या साक्षीवरुन तथाकथीत घटना संशयापलीकडे सिध्द होवुन शकत नाही.

**१७.** घटनास्थळ पंचनाम्याच्या अवलोकनावरुन घटनास्थळावरुन एक काठी जप्त केल्याचे दिसुन येते. परंतु फिर्यादीने तिचे सरतपासात तिला आरोपींनी काठीने मारहाण केली असे सांगितलेले नाही. त्यामुळे घटनास्थळ पंचनामा संशयास्पद दिसुन येते. सदर प्रकरणातील उपलब्ध वैदयकीय साक्षीदाराचे पुराव्यावरुन तथाकथीत घटना तारखेला फिर्यादी जखमी झाली होती, तिला मार लागलेला होता हे दिसुन येते. परंतु, महत्वाचे साक्षीदार साक्षीदार क्र. २ सारिका बनसोडे व वेदांत बनसोडे यांची साक्ष विश्वसनीय नसल्यामुळे आरोपींनी मारहाण केल्यामुळे फिर्यादीस जखमा झाले आहे हे सिध्द होवु शकत नाही.

**१८.** उपलब्ध पुराव्यावरुन तथाकथीत घटना, तारीख, वेळी आरोपींनी फिर्यादीस काठीने व लाथाबुक्यांनी मारहाण केली तसेच शिवीगाळ केली व जिवे

मारण्याची धमकी दिली हे संशयाच्या पलीकडे सिध्द होवु शकत नाही. त्यामुळे मी मुद्दा क्र. १ चे उत्तर नकारात्मक देत आहे.

**<u>मुद्दा क्र. २ ते ६ करीता –</u>**

**१९.** मी मुद्दा क्र. १ चे उत्तर नकारात्मक दिल्यामुळे फिर्याद निशाणी क्र. २४ प्रमाणे घटना घडली हे संशयाच्या पलिकडे जावुन सिध्द झालेले नाही. त्यामुळे आरोपींविरुध्द लावण्यात आलेले भा.द.वि. कलम ४५२, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ अंतर्गत दंडनिय गुन्हयाचे आरोप, सिध्द होवु शकत नाहीत. सबब मी मुद्दा क्र. २ ते ६ चे उत्तर नकारात्मक देत आहे.

**<u>मुद्दा क्र. ७ करीता –</u>**

**२०.** मी मुद्दा क्र. १ ते ६ ची उत्तरे नकारात्मक दिलेली आहेत व अभियोजनपक्ष तथाकथित घटना घडलेली आहे हे सिध्द करण्यास अपयशी ठरला व त्यामुळे आरोपींनी भा.द.वि. कलम ४५२, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ अंतर्गत दंडनिय गुन्हयाचे आरोप सिध्द करण्यास अपयशी ठरला या निष्कर्षास आलो आहे, व त्यामुळे आरोपी क्र. १ व २ हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. तसेच सदर प्रकरणात एक काठी जप्त करण्यात आलेली आहे. त्यामुळे त्या काठीची विल्हेवाटी करीता आदेश पारीत करणे आवश्यक आहे. सबब मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आ दे श</u>

| | |
|---|---|
| १. | आरोपी १. शितल किरण रणदिवे, २. मंगल महादेव जमदाडे याला भारतीय दंड विधानचे कलम ४५२, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ अन्वये दंडनिय गुन्ह्याच्या आरोपातून फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |

| | |
|---|---|
| २. | आरोपींचे जमानतीचे बंधपत्र व जातमुचलका याद्वारे रद्द करण्यात येत आहे. |
| ३. | फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७–अ प्रमाणे आरोपींनी रुपये १५,०००/– चे प्रत्येकी वैयक्तिक बंधपत्र द्यावेत. सदरहू जात मुचलक्यांचा अंमल हा पुढील सहा महिन्याच्या कालावधीकरीता लागू असेल. |
| ४. | सदर गुन्हयातील जप्त एक काठी मुल्यहीन असल्यामुळे अपील कालावधी संपुष्टात आल्यानंतर तो नाश करण्यात यावा. |
| | न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला. |

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by DILIP GANGADHAR JAGTAP
Date: 2026.07.15 16:42:01 +0530

( दिलीप गं. जगताप )

दिनांक :१५.०७.२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, परंडा.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Smt. P. R. Barangule |
| Name of Court | Shri. Dilip G. Jagtap, Jt. C. J. J.D. and J.M.F.C., Paranda |
| Date of Dictation | 15/07/2026 |
| Judgment signed by the P.O. on | 15/07/2026 |
| Judgment/Order uploaded on | 15/07/2026 |